| Article Date | Headline / Summary | Publication |
| --- | --- | --- |
| 29 Mar 2026 | Why is it important to have health insurance before birth? | Prabhat |

# जन्मापूर्वी हेल्थ इन्श्युरन्स असणं का महत्त्वाचं आहे?



मॅटर्निटी कव्हर हे बहुतेक सर्वसमावेशक हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसींमधील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कुटुंब नियोजनाचा विचार करणाऱ्या जोडप्यांसाठी हे कव्हरेज एक महत्त्वाचे आर्थिक संरक्षण देते.

ज्यामध्ये प्रामुख्याने प्रसूती संबधित आणि प्रसूती नंतरच्या खर्चाचा समावेश होतो. हे प्रसूती पूर्व आणि नंतरचा ९० दिवसांपर्यंत होणारा रुग्णाचा खर्च कव्हर करते.
जसे की हॉस्पिटलमधील वास्तव्य, औषधे, डॉक्टरांची फी आणि सर्जन, नर्स व रुग्णवाहिकेचे शुल्क यांचा अंतर्भाव असतो. तसेच तुमच्या बाळाच्या पहिल्या वर्षातील लसीकरणाचा खर्च पॉलिसीच्या अटी व शर्तीनुसार यामध्ये समाविष्ट होत असल्याने ही पॉलिसी बाळाच्या उत्तम आरोग्यासाठी एक सुरक्षा कवच ठरते.

**गर्भाची प्रसूतीपूर्व काळजी**

प्रसूतीचा खर्च मॅटर्निटी कव्हरमध्ये येतो खरा मात्र, गरोदरपणाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत लागणाऱ्या संपूर्ण हेल्थकेअर कव्हरेजचा विचार केला तर आजही अनेक बाबींचा अंतर्भाव त्यामध्ये नसतो. प्रसूतीपूर्व देखभाल कव्हर ही कमतरता भरुन काढते.

अन्यत्र न मिळणारे कव्हरेज या माध्यमातून उपलब्ध होते. ज्यामुळे बाळाच्या जन्माआधीच्या वैद्यकीय गरजा पूर्ण होतात. सर्वसाधारण मॅटर्निटी कव्हरपेक्षा हे वेगळे आहे. कारण हे प्रगत गर्भातील उपचार आणि हाय-रिस्क प्रेग्नन्सी दरम्यान काळजी, विशेष प्रसूतीपूर्व हस्तक्षेप यांसाठी लागणारा फायनान्शियल सपोर्ट उपलब्ध केला जातो.

म्हणूनच, सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपूर्ण संरक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक कव्हरच्या शोधात असलेल्या कुटुंबासाठी अशाप्रकारचे ड-ऑन अत्यंत अमूल्य ठरते.

**प्राथमिक निदान चाचण्या :** गर्भातील बाळाच्या आरोग्याची स्थिती वेळीच समजून घेण्यासाठी या कव्हरमध्ये विविध तपासण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**जीवनरक्षक उपचार :** गर्भधारणेत अडथळे आल्यास हे कव्हरेज गर्भातच रक्ताची तीव्र कमतरता असलेल्या बाळांना रक्त देणे, जुळ्या मुलांच्या बाबतीत उद्‌भवणाऱ्या गुंतागुंतीवर लेझर उपचार आणि हृदयाच्या गंभीर समस्यांवरील हार्ट व्हॉल्व्ह शस्त्रक्रिया सारख्या गंभीर उपचारांच्या खर्चाचा भार उचलते.

असे उपचार दुर्मिळ स्वरूपाचे असतात. मात्र, जेव्हा गरज असते तेव्हा ते बाळाचा जीव वाचवण्यासाठी अत्यंत मोलाचे ठरतात.

**प्रगत शस्त्रक्रिया उपचार :** काही वेळा जन्माआधीच बाळाच्या मणक्याच्या किंवा श्वासोच्छ्वासाच्या समस्या लक्षात येतात. अशा वेळी प्रगत शस्त्रक्रिया उपचारामुळे बाळाच्या सुदृढ विकासासाठी वेळेवर उपचार करणे शक्य होते.

जर बाळाच्या जन्माआधीच शस्त्रक्रियेची गरज भासली तर हे कव्हरेज तुम्हाला सर्वोत्तम तज्ज्ञांकडे उपचार घेण्यास मदत करते. जेणेकरून आई आणि बाळ दोघेही सुदृढ राहतील.

**गर्भधारणा सहाय्य प्रक्रिया :** ॲम्निओटिक फ्लुइडच्या (गर्भजल) पातळीचे संतुलन साधण्यासाठीच्या उपचारांसाठी सहाय्य केले जाते.

कुटुंबानी हे विचारात घ्यायला हवे की मॅटर्निटी कव्हर मिळवण्यासाठी किमान २ वर्षे आणि फीटल फ्लरीश सारख्या प्रसूतीपूर्व कव्हरसाठी ९ महिने प्रतीक्षा कालावधी असतो. म्हणूनच, सध्या गर्भधारणेच्या स्थितीत असलेल्यांपेक्षा गर्भधारणेची योजना असणाऱ्यांसाठी अधिक उचित ठरते.

प्रसूतीपूर्व देखभाल आणि मॅटर्निटी कव्हर या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मॅटर्निटी कव्हरचा संपूर्ण भर हा डिलिव्हरी आणि तत्काळ प्रसूतीनंतरच्या गरजांवर असतो. तर प्रसूतीपूर्व देखभालीत गर्भधारणेदरम्यान तसेच अगदी जन्माच्या काही महिन्यांपूर्वी आवश्यक वैद्यकीय मदतीवर असतो.

जेव्हा आरोग्याची समस्या उद्‌भवते, तेव्हाच या पर्यायांची जाणीव होते; अशा वेळी आधीच माहिती नसल्यामुळे योग्य नियोजन करणे कठीण होते.

मॅटर्निटी कव्हरेज आणि प्रसूतीपूर्व सहाय्य यांमधील फरक समजून घेतल्यास भविष्यातील गरजांचे योग्य नियोजन करणे कुटुंबांना सोपे जाते. आजच्या काळात गर्भधारणेदरम्यान अनेक आव्हाने येऊ शकतात. अशा वेळी उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकीय सुविधांची माहिती असल्यास, पालक सुरुवातीलाच योग्य निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे मानसिक व आर्थिक तारण कमी होण्यासा मदत होते.

**- डॉ. तपन सिंघेल,**
एमडी आणि सीईओ, बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड